**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९

(फोन नं.०२४२३ - २५८५००/२५९६२६) फॅक्स नं.२५८८७०

(Website - www.sai.org.in, Email – saibabacollege1@sai.org.in )

## जाहीर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थानचे वरीष्ठ महाविद्यालयासाठी फर्निचर खरेदीकामी नामांकित कंपन्या/अधिकृत वितरक व विक्रेते यांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

**निविदा किंमत** – रु.१,२००/- (रु. एक हजार दोनशे मात्र)
**बयाणा रक्कम** – रु.६,०००/- (रु.सहा हजार मात्र)

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि. २५/२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. ११/३/२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. निविदाधारकाने सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

४. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि. १३/३/२०१९ रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा अंशत / पुर्णपणे स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

**(श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**शिरडी ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर**

दूरध्वनी क्रमांक (९५-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५९९२६

फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०

Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.saibabacollege1@gmail.com

**मुंबई कार्यालय-साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर**

मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६


# संस्थानचे वरीष्ठ महाविद्यालयासाठी फर्निचर पुरविणेबाबत ई-निविदा

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

### निविदाधारकांसाठी सूचना

१. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे व इतर शर्ती/अटींचा तपशील सोबत दिलेला आहे.

२. निविदाधारकाने निविदेसोबत ई-निविदा फी रक्कम रु.१,२००/- (अक्षरी रुपये एक हजार दोनशे मात्र) व बयाणा रक्कम रु.६,०००/- (अक्षरी रुपये सहा हजार मात्र) www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर भरावी.

३. पूर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे.

४. सदर निविदा दि.२५/२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि.११/३/२०१९ सायं. ०५.०० वा.पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

५. **ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.**

६. सदर निविदेसाठी जर तीनपेक्षा कमी निविदाधारकांच्या ई-निविदा प्राप्त झाल्यास खरेदी नियमावलीनुसार ई-निविदेस मुदतवाढ देण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

७. शक्य झाल्यास दि. १३/३/२०१९ रोजी ई-निविदा Technical Bid उघडण्यात येईल. त्यातील Online Upload केलेली कागदपत्रे मागणीप्रमाणे असल्यास अशा निविदाधारकांचे Commercial Bid चा विचार करण्यात येईल.

८. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित रहावे. उपस्थित राहणेकामी दुरध्वनीव्दारे कळविण्यात येईल.

९. **संस्थानला फर्निचर कशाप्रकारचे आवश्यक आहे. याबाबत Technical Specifications BOQ दिलेले आहेत. ते विचारात घेऊनच ई-निविदा भरण्यात यावी.**

१०. अपुर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

११. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णपणे स्विकारणेचा अगर सर्व निविदा नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

**(श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
## शिर्डी- ४२३ १०९.
## तालुका- राहाता, जिल्हा-अहमदनगर

### निविदेच्या शर्ती व अटी

१. **फर्निचर Specifications प्रमाणे फर्निचरचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.**

२. फर्निचर खरेदीचा तपशिल सोबतचे परिशिष्टात (BOQ मध्ये) दिलेला आहे त्यात दर नमुद करुन निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

३. दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/उत्पादक परवाना अगर तत्सम शासकीय परवाना, GST नोंदणी क्रमांक प्रमाणपत्र किंवा ऑनलाईन GST क्रमांक पावती, पॅन कार्ड इ. सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत.

४. निविदा मंजुर झालेनंतर मंजुर निविदाधारकाला संस्थानकडून इरादा पत्र दिले जाईल. त्याप्रमाणे ३% सुरक्षा अनामत रक्कम भरावी लागेल व १५ दिवसाचे आत संस्थानने निविदेमध्ये नमुद केलेल्या स्पेसिफिकेशन्सप्रमाणे नमुने संस्थानचे कनिष्ठ महाविदयालयाकडे दाखवुन सदर फर्निचरचा नमुना मान्य केलेनंतर, संस्थानकडून फर्निचर पुरवठा करणेबाबत करारनामा करुन घेऊन पुरवठा आदेश देण्यात येईल. पुरवठा आदेश दिलेचे तारखेपासून मान्य नमुन्याप्रमाणेच फर्निचरचा पुरवठा ४५ दिवस अगर त्यापेक्षा अगोदर करावा लागेल.

५. निविदाधारकाने निविदा सादर करताना GST कराचा बोजाचा विचार करुनच निविदा सादर करावी. निविदाधारकाने सदरचे दर हे सर्व कर व खर्चासह शिर्डी येथील संस्थानचे भांडार/संबंधित महाविदयालयाकडे पोहोचचे द्यावेत. GST, वाहतुक, हमाली, पॅकिंग व फॉरवडींग वगैरे कुठलाही खर्च वेगळा आदा केला जाणार नाही.

६. निविदा मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित डी.डी.व्दारे/रोखीने भरावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. **करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.**

७. निविदाधारकाची निविदा मंजूर झालेचा निर्णय झाल्यावर वरील नमूद अ.नं. ४ प्रमाणे नमुना फर्निचर व ६ प्रमाणे सुरक्षा अनामत रकमेची पूर्तता करावी.

८. सदरच्या पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

९. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

...२...

७/१२

१०. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासन खरेदी नियमावलीतील नियम क्र. ३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्यूनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार द्वितीय न्यूनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील द्वितीय न्यूनतम दरधारक जर न्यूनतम दर धारकाच्या दरात माल पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या मालाच्या ५० टक्के मालाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादारांना देण्यात येतील व जर तयार नसतील तर पूर्ण मालाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादारांना देण्यात येईल.

११. शासन नियमानुसार कराच्या आवश्यक असलेल्या कपाती बिलातून करण्यात येतील.

**१२. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.**

१३. निविदाधारकांच्या अटी/शर्ती संस्थानवर बंधनकारक राहणार नाहीत.

१४. कोणतीही निविदा मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अगर सर्व निविदा नाकारण्याचा हक्क संस्थानने राखून ठेवला आहे.

१५. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी निविदा अंतीम दिनांकानंतर १८० दिवसांचा राहील.

१६. संस्थानचे पुरवठा आदेशाप्रमाणे फर्निचर पुरविलेनंतर संबधित विभागाकडून त्याची तपासणी करण्यात येईल. त्यांचे अभिप्रायानंतर बीलाची रक्कम आदा करण्यात येईल. फर्निचर Specification प्रमाणे नसल्यास स्वखर्चाने १५ दिवसांत बदलून दयावे लागेल अन्यथा नियमानुसार दंडाची आकारणी करण्यात येईल.

१७. फर्निचरचा पुरवठा केलेनंतर साधारण ३० दिवसांत बीलाची रक्कम आदा करण्याचा प्रयत्न राहील.

१८. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

१९. सदर निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवला आहे.

**आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

२०. पुरवठा आदेशातील फर्निचर मुदतीत पुरविले नाहीत तर पुरवठा न केलेल्या फर्निचरच्या किंमतीच्या ०.५ % ते ५ % पर्यंत दंड करण्यात येईल व सदर दंडाची वसुली आपले बिलातून अगर सुरक्षा अनामत रकमेतून विलंबाचे कालावधीनुसार खालीलप्रमाणे करण्यात येईल.

अ) पुरवठा न केलेले फर्निचरची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास – प्रति आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत

आ) पुरवठा न केलेले फर्निचरची किंमत रु.२.०० लाखापेक्षा जास्त असल्यास – प्रति आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत

मात्र विलंबाने पुरवठा केलेला माल स्विकारण्याचे बंधन संस्थानवर राहणार नाही.



३/५२

२१. फर्निचरचा पुरवठा न झाल्यास, अगर दिलेल्या **Technical Specifications** प्रमाणे नसल्यामुळे तो नाकारला गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितका किंवा दिलेल्या पुरवठा आदेशाइतके फर्निचर दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या फर्निचरसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई निविदाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या मालाच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

२२. निविदेतील मंजुर दराने व पुरवठा आदेशाप्रमाणे सदर फर्निचरचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने फर्निचरचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन सदर फर्निचर खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

२३. निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक फर्निचरचा पुरवठा करु शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप मा.व्यवस्थापन समिती/मा.उप समिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी घेतील तो निविदाधारकावर बंधनकारक राहिल.

**(श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ----------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ----------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ----------------------------------------

ऑफीस ----------------------------------------

दुकान ----------------------------------------

निवास ----------------------------------------

मोबाईल नंबर ----------------------------------------

फॅक्स नंबर ----------------------------------------

ई –मेल ----------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ----------------------------------------

दूरध्वनी क्रमांक- ----------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे- १. ----------------------------------------

२. ----------------------------------------

दिनांक - / /२०१८
ठिकाण -

निविदाधारकाची सही व शिक्का

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/उत्पादक परवाना/ स्थानिक स्वराज्य संस्था परवाना (उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका) अगर तत्सम शासकीय परवाना

२. GST नोंदणी क्रमांक प्रमाणपत्र किंवा ऑनलाईन GST क्रमांक पावती

३. पॅन कार्ड

दिनांक - / /२०१९

ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**



८/५८

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय – श्री साईबाबा संस्थानचे वरीष्ठ महाविद्यालयासाठी फर्निचर पुरविण्याची ई-निविदा...**

महोदय,

मी/आम्ही खालील सही करणार कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली ई-निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या फर्निचरचा, आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर फर्निचरचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त फर्निचरची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

सोबत नियमाप्रमाणे बयाणा रक्कम भरलेली आहे.

ज्या दराने निविदा मंजुर होतील, त्या मान्य दराने फर्निचरचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर मालाच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यानंतर त्वरित मी/आम्ही रोख भरणा करु. बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच यानंतरही सुरक्षा अनामत रक्कम पुर्ण होऊ शकली नाही, तर उर्वरीत सुरक्षा अनामत रक्कम रोख/डी.डी./RTGS/NEFT व्दारे भरु. तसेच रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत मान्य नमुन्याप्रमाणे फर्निचर वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०१९
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१) ------------------------------------

(२) ------------------------------------

**सोबत-** कागदपत्रे

# BOQ

| Sr. No. | Description | Quantity | Unit | Rate per Number In-cluding all taxes | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | प्लेन टेबल (प्रयोगशाळेकरीता)<br>Biology - Size - 10'L X 2.5'W X 2.5'H<br>With metal storage & granite top.<br>(Under storage) | 14 | Number | | |
| 2 | प्लेन टेबल (इतर वापराकरिता)<br>Size - 8'L X 2'W X 2.5'H<br>With laminated Ply.top. | 40 | Number | | |

(Smt.Rubal Agarwal, I.A.S.)
Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi